## सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री.प्र.प्र.राजवैद्य)

### तक्रार यूएलपी क्र.२१/२०२३

(CNR NO. MHIC130000352023)

श्री.शिवाजी विठठल राजगुरु ... तक्रारदार.

**विरूध्द**

वन संरक्षक, वन विभाग पुणे व १ ... सामनेवाले

..........................................................................................................

श्री.व्ही.आर.देशपांडे,तक्रारदारातर्फे विद्वान वकील.

श्रीमती.चितापुरे, सामनेवालेतर्फे विद्वान वकील.

..........................................................................................................

### : निशाणी क्र.यू—१४ वर आदेश :

(दिनांकः—०९/१०/२०२४)

१. अर्ज व त्यावर सामनेवाले यांच्यावतीने देण्यात आलेला जबाब वाचला. तक्रारदारातर्फे विद्वान वकील श्री.देशपांडे यांचा तर सामनेवाले यांचेतर्फे विद्वान वकील श्रीमती चितापुरे यांचा युक्तिवाद मी ऐकला. संपुर्ण संचिकेची मी पाहणी केली.

२. तक्रारदाराच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की सामनेवाले यांचेकडे कार्यरत असताना तक्रारदारांने १९८२ सालापासून ते सेवानिवृत्त होईपर्यंत दरवर्षी २४० दिवसांपेक्षा जास्त काम केले आहे असे प्रकथन करुन तक्रारदाराने मूळ तक्रार अर्जात मागण्या केल्या आहेत व त्यासंदर्भातील अभिलेख सामनेवाले यांच्या ताब्यात आहेत त्यामुळे ते अभिलेख या न्यायालयासमोर येणे गरजेचे असल्याने तसा आदेश सामनेवाले यांना देण्यात यावा.

३. याउलट सामनेवाले यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, तक्रारदाराने सुमारे ३० ते ३५ वर्षानंतर प्रस्तुतचा तक्रार अर्ज खोटी व चुकीची प्रकथने करुन दाखल केला आहे व त्याने मागणी केलेले दस्तऐवज अतिशय जुने असल्याने उपलब्ध होणे शक्य नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सामनेवाले यांचेकडे तो १९८२ साली वन मजूर म्हणून कामास लागला व वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर दि.३०/०६/२००० रोजी सेवानिवृत्त झाला तसेच त्याने त्या दरम्यानच्या कालावधीत सामनेवाले यांचेकडे दरवर्षी २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केले मात्र तरीही त्याला रोजंदारी वर राबवून घेण्यात व शासन परिपत्रकांचा फायदा देण्यात आला नाही अशी प्रकथने करुन तक्रारदाराने त्याला १९८७ पासून अगर दि.०१/११/१९८९ पासून सेवेत कायम करण्याचा आदेश सामनेवाले यांना देवून येणा—या फरकाच्या रकमा व दरमहा पेन्शन देण्याचा आदेश देखील देण्यात यावा अशा विनंत्या तक्रार अर्जात केल्या आहेत. तक्रारदाराने त्याचे सेवानिवृत्तीनंतर सुमारे २० वर्षानंतर प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल केला आहे हा सामनेवाले यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद जरी स्विकारार्ह असला तरी तक्रारदाराने मूळ तक्रार अर्जात केलेल्या मागण्या विचारात घेता १९८२ पासून ते तक्रारदार दि.३०/०६/२००० रोजी सेवानिवृत्त झाला तो पर्यतचे त्याचे हजेरीपत्रक व पगारपत्रक तसेच सामनेवाले यांनी दि.१८/०५/२००४ रोजीच्या पत्रासोबत पाठविलेला प्रस्ताव व त्यासोबतची कागदपत्रे हे दस्तऐवज मूळ तक्रार अर्ज गुणवत्तेवर योग्यप्रकारे निकाली काढण्यासाठी या न्यायालयासमोर असणे गरजेचे दिसून येते. तक्रारदारास विविध योजनांतर्गत कामे दिल्याबाबतचे प्रस्ताव, तहसिलदार यांचेशी झालेला पत्रव्यवहार व हजेरी रजिस्टर इत्यादी कागदपत्रे दाखल करण्याचा आदेश सामनेवाले यांना देण्यात यावा अशी विनंती जरी तक्रारदाराने केली असली तरी त्याला इतर योजनांतर्गत काम देण्यात येत होते असे तक्रारदाराने तक्रार अर्जात नमूद केलेले नसल्याने ती कागदपत्रे दाखल करण्याचा आदेश सामनेवाले यांना देणे गरजेचे दिसून येत नाही. तक्रारदाराने विलंबाने मूळ तक्रार अर्ज दाखल केला ही बाब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यासाठी पुरेशी दिसून येत नाही.

अर्जात नमूद अनुक्रमे ३अ व ३ब वरील कागदपत्रे सामनेवाले यांचे  ताब्यात आहेत या त्याच्या वक्तव्याच्या समर्थनार्थ तक्रारदाराने स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सामनेवाले यांच्यावतीने देण्यात आलेल्या जबाबाच्या समर्थनार्थ सामनेवाले यांच्या कोणाही जबाबदार अधिका—याचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलेले नाही. उपरोक्त नमूद सर्व बाबी विचारात घेता अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे असे म्हणत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

अर्ज नि.क्र.यू.१४ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

तक्रारदाराने प्रस्तुतच्या अर्जात परिच्छेद क्र.३अ व ३ब मध्ये नमूद केलेले मूळ दस्तऐवज अथवा त्या दस्तांच्या प्रमाणित प्रती या न्यायालयात दाखल कराव्यात असे सामनेवाले यांना आदेशित करण्यात येत आहे.

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2024.10.09 16:48:22 +0530

दिनांकः—०९/१०/२०२४.  ( प्र. प्र. राजवैद्य )

*माकम/—*

सदस्य, औद्योगिक न्यायालय,
सोलापूर.